जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर.
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक २२.०७.२०२५**

खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे यांचेकडुन हॉटेल व्यवसायिकांना खंडणी मागणारा आर.टी.आय कार्यकर्ता अटक.

खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहर कार्यालयाकडे फिर्यादी नामे देवराज तिमप्पा पुजारी यांनी तक्रारी अर्ज दाखल केला होता. सदर अर्जामध्ये इसम नामे नितीन घोले हा कल्याण परिसरातील हॉटेल व्यवसायिका विरुध्द खोटया तक्रारी करण्यांची धमकी देवुन खंडणी मागणी करीत असल्याचे अर्जामध्ये तक्रार केली होती.

सदर तक्रारी अर्जाचे अनुषंगाने खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहर येथील अधिकारी व अंमलदार यांनी दिनांक २१/०७/२०२५ रोजी संतोष हॉटेल, कल्याण पश्चिम याठिकाणी सापळयाचे आयोजन करून यातील खंडणी मागणारा इसम नामे नितीन शांताराम घोले वय ४९ वर्षे, धंदा व्यवसाय रा. रूम नंबर १०३, शंकेश्वर प्रेसिडेन्सी बिल्डीग नंबर ०२, तावरीपाडा, आर.डी.ओ. च्या पाठीमागे, कल्याण पश्चिम यास खंडणीची रक्कम रू ५०,०००/- रू स्विकारले असताना २३.५५ वाजता ताब्यात घेण्यात आले आहे. सदर आरोपीत यांचे विरुध्द महात्मा फुले चौक पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ८४५/२०२५ बीएनएस कायदा कलम ३०८(२), ३०८(३), ३०८(४), ३०८(३), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपीस रिमांडकामी मा.न्यायालयात हजर करण्यात येत असुन गुन्हयाचा पुढील तपास खंडणी विरोधी पथक, ठाणे करीत आहे.

सदर आरोपी हा स्वतः आरटीआय कार्यकर्तो असल्याचे व त्यास पोलीस व इतर शासकिय अधिकारी घाबरत असुन त्यास पैसे दिले नाही तर फिर्यादीस खोटया गुन्हयामध्ये अडकविण्याची धमकी देवुन खंडणी मागत असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्याने अशाप्रकारे इतरही हॉटेल व्यवसायिकांकडुन खंडणी घेतली असल्याची शक्यता असुन तशी मागणी झाली असल्यास संबंधीतानी नजिकच्या पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दाखल करण्याचे अवाहन करण्यात येत आहे.

सदरची कारवाई श्री.डॉ.पंजाबराव उगले, अपर पोलीस आयुक्त, (गुन्हे), ठाणे शहर श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे), ठाणे, श्री.विनय घोरपडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, शोध -२, गुन्हे शाखा, ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.शैलेश साळवी, सपोनि/कृष्णा गोरे, पोहवा/कानडे, शिंदे, चापोहवा/हिवरे, पोना/ हासे, पोशि/ढाकणे यानी केली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर.